INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February-2019 Special Issue – 111 (B)

## साहित्य : संस्कृती, समाज व माध्यमांतर

अतिथी संपादक

डॉ. व्ही. बी. गायकवाड

प्राचार्य,

के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक

विशेषांक संपादक

डॉ. दिलीप पी. पवार

विभाग प्रमुख व समन्वयक, मराठी संशोधन केंद्र,

के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक

मुख्य संपादक

डॉ. धनराज धनगर (येवला)

This Journal is indexed in :

- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

## Editorial Board

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV'S Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
**Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)**
**Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)**
**Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)**
**Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)**

**Co-Editors -**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar** - BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik.
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon.
- **Prof. Vinay Madgaonkar -** Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik -** Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh -** Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon
- **Dr. Samjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari
- **Prof. Vijay Shirsath** - Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.]**
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul **[M.S.]**
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik **[M.S.]**
- **Dr. Hitesh Brijwasi** - Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.]**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.]**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.]**

## Advisory Board -
- **Dr. Marianna kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare -** Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur -** Chairman, BoS., Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Act. Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

## Review Committee -
- **Dr. J. S. More** – BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**– BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali ,** HOD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** – Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar –** M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

**Published by –**
**© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

# यंत्र–तंत्रज्ञानाधिष्ठित साहित्याची वाटचाल

**प्रा. डॉ. प्रमोद गंगाधर आंबेकर**
महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित,
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,
मनमाड ता. नांदगाव जि. नाशिक
मो. ९९२२७१३८२५

**प्रास्ताविक :**

मराठी वाङ्मयाचा ऐतिहासिकदृष्ट्या अभ्यास करताना, अभ्यासाच्या सोयीसाठी (१) प्रारंभ ते इ.स. १८१८ (२) इ.स.१८१८ ते १८४७ (३) इ.स. १८७४ ते १९२० (४) इ.स. १९२० ते १९६० (५) इ.स. १९६० ते १९९० (६) इ.स. १९९० नंतरचे नव्वदोत्तरी साहित्य असे कालखंड पाडले जातात. तर राजकीयदृष्ट्या यादवकाळ, बहामणी काळ, शिवकाळ, पेशवेकाळ, अव्वल इंग्रजी कालखंड, स्वातंत्र्योत्तर कालखंड असे कालखंड पाडले जातात. अर्वाचित (आधुनिक) मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचा प्रारंभकाल हा साधारणत: इ.स. १८१८ असा मानला जातो. मराठी भाषेतील पुस्तकाला मुद्रण संस्कार इ.स. १८०५ मध्ये कलकत्याजवळील (कोलकत्ता) सेरामपूर येथे प्राप्त झाला. हाच मराठी साहित्याला तंत्रज्ञानाचा झालेला पहिला स्पर्श असावा. 'सेंट मॅथ्यू' आणि 'मराठी भाषेचे व्याकरण' ही मराठी भाषेतील पहिली मुद्रित झालेली पुस्तके होय. इ.स. १८१८ पर्यंत जवळजवळ दहा पुस्तके मुद्रित झाली. इ.स. १८१८ नंतरच्या अर्वाचीन मराठी वाङ्मयात इंग्रजी शिक्षणाच्या नव्या जाणिवांबरोबरच जुने वाङ्मय प्रकारही नव्या स्वरुपात साकार झाले. शिक्षणाचा प्रसार, मुद्रणाची व्यवस्था, वाचनाची आवड यांचा परिणाम म्हणून वाङ्मयाची सतत वाढ होत गेली. वाङ्मयाच्या क्षेत्रात नवे विचार, नवे सिद्धांत, नवे संप्रदाय, साहित्यविचार, समीक्षा निर्माण झाले. औद्योगीक क्रांतीमुळे मानवी जीवनाला गतिमानता प्राप्त झाली. यंत्राधिष्ठित संस्कृतीमुळे बदलणाऱ्या गतिमान मानवी जीवनाबरोबरच साहित्याचे स्वरुपही पालटले. मराठी वाङ्मयाची कथा, कादंबरी, कविता, चरित्र, आत्मचरित्र, नाटक इ. प्रकारात तसेच साहित्य विचार, समीक्षा विचार यांचीही विपूल निर्मिती होत गेली. २० व्या शतकाच्या उत्तरार्धातील तंत्रज्ञान क्रांतीमुळे आणि २१ व्या शतकाच्या पहिल्या दोन शतकात त्यात झालेल्या अमूलाग्र बदलामुळे साहित्याची विविध आविष्कार रुपे उदयाला आलेली दिसतात.

**मुद्रणक्रांती आणि मराठी साहित्य :**

महाराष्ट्रातील युरोपियनांच्या, मुख्यत्वे इंग्रजांच्या मुद्रणप्रसारामुळे जीवनाला एक गती प्राप्त झाली. विज्ञानाशी परिचय झाला. साहित्य जीवनाचे एक अविभाज्य अंग बनले. पूर्वीचे साहित्य जवळजवळ कालनिरपेक्ष होते. मुद्रणोत्तर काळात कालसापेक्षता आणि सापेक्षता वाढली. लेखकांचा, विचारवंतांचा, तत्त्वज्ञांचा जीवनविषयक, साहित्यविषयक दृष्टीकोन बदलला तसेच वाचकांचाही दृष्टिकोन बदलला. वाचक आणि लेखक यांच्यात प्रत्यक्ष व्यवहार सुरु झाला. साहित्यक्षेत्रात कलात्मक दृष्टीचे बीजारोपण झाले. सामाजिक घटनांना, विचारांना अधिक गती प्राप्त करुन देण्याचा साहित्याने प्रयत्न केला. मुद्रणामुळे एक नवी, आधुनिक संस्कृती उदयाला आली. मुद्रणोत्तर काळाविषयी एका ठिकाणी श्री. दु. का. संत लिहितात, ''पुस्तके छापणे शक्य झाल्याने सर्वसाधारण व्यक्तीस ज्ञान देणे शक्य कोटीतले झाले व सुलभ झाले. शिक्षणाचे स्वरुप फार बदलले. नव्या नव्या शोधाचे ज्ञान एका वर्गाच्या सेवेसाठी कुलुपाच्या आड न राहता सर्व साधारण व्यक्तीपर्यंत

त्याचे लोण पोहचविणे शक्य झाले.'' मुद्रणकलेमुळे गद्यास विलक्षण महत्त्व आले. त्यामुळे रोजच्या बोलण्याच्या भाषेत व गद्यात ज्ञान घेता आल्याने ज्ञानाची क्षितिजे अधिकाधिक रुंदावत गेली. मोठमोठे लेखक, इतिहासकार, निबंधकारांचे, समाजसेवकांचे गद्य प्रधान लेखन होऊ लागले. साहित्य म्हणजे काव्य हे समीकरण नष्ट होऊन व्यापक कल्पनांचे बीज पेरले गेले. त्या बीजापासूनच आधुनिक वैज्ञानिक, नव्या युगाच्या, नव्या संस्कृतीचा उदय झाला. महाराष्ट्राच्या संस्कृतीला पौर्वात्य आणि पाश्चिमात्य या दोन संस्कृतीच्या सहचर्याने संमिश्र स्वरुप प्राप्त होऊ लागले. महाराष्ट्राच्या उदयोन्मुख नव्या संस्कृतीत मुद्रणकलेचा अत्यंत महत्त्वाचा दूरगामी परिणाम झाला. महाराष्ट्रातील मुद्रणाच्या क्रांतीमुळे सामाजीक क्रांतीबरोबरच मानसिक क्रांतीही झाली. एका नव्या प्रबोधन युगाचा प्रारंभ झाला.

महाराष्ट्रातील प्रबोधनयुगाचा प्रारंभ बाळशास्त्री जांभेकर यांच्यापासून झाला. मुद्रण-निबंध-प्रबोधन असे सूत्र बाळशास्त्री जांभेकर यांनी मानले होते. त्यांनी 'दर्पण' हे नियतकालीक सुरु केले आणि एक नवे युग पश्चिम भारतात व महाराष्ट्रात सुरु करण्याचा महनीय प्रयत्न केला. त्यानंतर मराठीत नियतकालिकांची एक मोठी परंपरा निर्माण झाली. समाजातील विविध समस्या, विश्लेषणात्मक स्वरुपात समाजापर्यंत पोहचविणे, समाजात जागृती घडवून आणणे, एक विचार एकाचवेळी असंख्य लोकांच्या मनात रुजविण्याचे कार्य नियतकालीकांनी केले. त्याचबरोबर महाराष्ट्रातील नव्या युगाची, नव्या जागरणाची, नव्या संस्कृतिची बीजे पेरण्याचे कार्य नियतकालीकांनी केलेले आहे.

इंग्रजांचे शैक्षणिक धोरण आणि मुद्रण कला यामुळे १९ व्या शतकात नियतकालिकांच्या उदयाबरोबरच मराठी साहित्याच्या विविध आविष्कार रुपांनी जन्म घेतला. त्यात प्रामुख्याने केशवसुतांनी कवितेचा, हरिभाऊ आपटे यांनी कथा-कादंबरीचा, आण्णासाहेब किर्लोस्करांनी नाटकांचा तसाच बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, म. फुले, विष्णूशास्त्री चिपळूणकर इ. यांनी वैचारिक निबंधांचा रुपबंध नव्यानेच घडवला. त्यामुळे २० व्या शतकाच्या पहिल्या पाव शतकात विचारांच्या आणि कलांच्या क्षेत्रात महाराष्ट्र अग्रभागी होता असे दिसून येते. इ.स. १८१८ ते १८७४ या कालखंडात त्याच्यावर पडलेले पराभवाचे सावट विरुन जाऊन स्वातंत्र्याच्या प्रेरणेची झळाळी त्याच्या चेहऱ्यावर दिसून येते. मधल्या सहा-सात दशकांच्या अंतरायानंतर त्याच्यातली बौद्धीक आणि कलात्मक सर्जनाची ऊर्जा पुन्हा कार्यरत झालेली दिसते. पुढे मुद्रण क्षेत्रातील क्रांतीमुळे तसेच संगणकीय क्रांतीमुळे पुस्तकांचा, नियतकालिकांचा चेहरामोहरा दिवसेंदिवस बदलत गेलेला आहे.

**तंत्रज्ञान क्रांती आणि सांस्कृतिक स्थित्यंतर :-**

भारतामध्ये २३ जुलै १९२७ रोजी मुंबई येथे पहिले आकाशवाणी केंद्र सुरु झाले. तेव्हापासून आजतागायत आकाशवाणीचा प्रसार आणि प्रभाव सतत वाढत आहे. आकाशवाणीच्या कार्यपद्धतीवर शासनाचे नियंत्रण, संगीत, नाट्य असे मनोरंजनाचे कार्यक्रम, बातम्या असे शासकीय धोरणांचा प्रसार करणारे कार्यक्रम, भाषणासारखे निवेदनात्मक तर शालेय विद्यार्थ्यांसाठी प्रसारित करण्यात येणारे कार्यक्रम असे विविध प्रकारचे कार्यक्रम आकाशवाणीवर नियोजीत केले जातात. सद्यस्थितीत मोठ्या शहरांमध्ये अनेक एफएम केंद्रे चालू झालेली दिसतात. आधुनिक जीवनामध्ये तंत्रविज्ञानाच्या प्रगतीचा आधार घेऊन जी महत्त्वाची जनसंवाद माध्यमे रुढ झाली, त्यापैकी आकाशवाणी हे सर्वात प्रभावी माध्यम आहे. भारतासारख्या खंडप्राय, बहुभाषिक, भौगोलीक आणि सांस्कृतिकदृष्ट्या विविधतेने नटलेल्या देशात हे श्राव्य माध्यम महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

दि. १५ सप्टेंबर १९५९ रोजी भारतात दूरदर्शनची प्रथम सुरुवात झाली. 'फिलिप्स इंडिया' या कंपनीने सरकारला एक कमी खर्चाचा प्रक्षेपक बनवून दिला. हा प्रक्षेपक आणि अमेरिकेने केलेली मदत यामुळे नवी

ISSN : 2348-7143
January-2019

दिल्लीत समाजशिक्षणाचे ध्येय डोळ्यांपुढे ठेवून एक प्रायोगिक स्वरूपाचे दूरदर्शन केंद्र सुरू करण्यात आले. या प्रक्षेपण केंद्राची सीमा ४० किलोमीटर पर्यंत होती. एवढ्या परिघात १८० दूरदर्शन मंडळे तयार करून त्यांना युनेस्कोने दूरदर्शन संच मोफत दिले. ऑगस्ट १९६५ पासून मनोरंजन व माहिती देणारे कार्यक्रम दूरदर्शनवरून सुरू झाले. त्याच बरोबर समाजशिक्षणाचेही कार्य दूरदर्शनने करावे ही अपेक्षा व्यक्त केली गेली. यादृष्टीने १९७० मध्ये कार्यक्रमाचा वेळ वाढवून तीन तास करण्यात आला व त्यात बातम्या माहिती देणारे कार्यक्रम, मनोरंजनाचे कार्यक्रम, कृषी विषयक व कामगार विषयक कार्यक्रम असे वैविध्य आले. त्यानंतर तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे दूरदर्शन केंद्रांची प्रक्षेपण क्षमता वाढली. दूरदर्शन संच आवाक्यातील किमतीत सहज उपलब्ध होत गेले. त्यामुळे घरोघर ते पोहोचले. डीटीएच सेवेमुळे आता तर ग्रामीण, दुर्गम भागातही शेकडो वाहिन्या दाखविल्या जात आहे. त्यातही दिवसेंदिवस प्रगती होत आहे.

२० व्या शतकाच्या उत्तरार्धात श्राव्य आणि दृकश्राव्य माध्यमांबरोबरच संगणक क्रांतीमुळे इलेक्ट्रॉनिक्स माध्यमाची भर पडली. इंटरनेटचे वाढते जाळे, मोबाईल क्रांती, स्मार्टफोनचा उदय यामुळे जनसंपर्काच्या माध्यमांमध्ये प्रचंड प्रमाणात स्थित्यंतर झाले. त्यामुळे ग्लोबल व्हीलेजची संकल्पना अस्तित्वात आली. २०१९ च्या अखेरपर्यंत जगातील ५२० कोटी लोक मोबाईल युजर्स असतील, म्हणजे साधारणतः ६९ टक्के लोकांच्या हाती मोबाईल असेल, असा अंदाज तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज सिस्को सिस्टीमने व्यक्त केला आहे. त्यांनी ग्लोबल मोबाइल डेटा ट्राफिकबद्दल बहुवार्षिक अंदाजपत्रक जारी केले आहे. त्यात २०१४ पासून २०१९ पर्यंत मोबाईल युजर्स, इंटरनेटची गती, नवे तंत्रज्ञान, डेटा ट्रॅफिकच्या प्रमाणाबद्दल अंदाज वर्तवला आहे. यात दर महिन्याला २४.३ एक्साबाइटस् म्हणजेच २४०० कोटी गिगाबाइट ट्रॅफिकचा अंदाज आहे. २०१९ मध्ये ग्लोबल ट्राफिकपैकी ९७ टक्के वाटा स्मार्टफोन उपकरणांचा असेल. सिस्कोनुसार यात व्हिडिओची सर्वाधिक भूमिका असेल. आज प्रत्येकाजवळ स्मार्टफोन किंवा मोबाईल फोन असतो. त्यामुळे जगाच्या कानाकोपऱ्यात घडणाऱ्या गोष्टी काही क्षणात जगभरात कोठेही पोहोचू शकत आहे. विविध प्रांतातील पोषाख, अन्नपदार्थ बनविण्याच्या पद्धती, घरबांधणीच्या पद्धती, इत्यादी गोष्टी त्या प्रांतात न जाताही इतर लोकांना स्मार्टफोनमुळे पाहायला मिळत आहेत. जे आवडते त्याचे अनुकरणही मोठ्या प्रमाणात होत आहे. आज तर तरुण पिढी या मोबाईलची गुलाम होऊ पाहत आहे. परंतु या तंत्रज्ञानातील क्रांतीमुळे साहित्याचे विविध आविष्कार रुपे उदयाला येत आहेत. छायाचित्रणाच्या क्षेत्रातील क्रांतीमुळे आणि दृकश्राव्य माध्यमांच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे मुद्रित साहित्याची दृकश्राव्य माध्यमांतरीत अविष्कार रूपेही उदयाला येत आहेत.

**साहित्याची तंत्रज्ञानाधिष्ठित अविष्कार रुपे :-**

२० व्या शतकाच्या उत्तरार्धापासून साहित्याच्या मुद्रित आविष्कार रुपांबरोबरच तंत्रज्ञानाधिष्ठित विविध आविष्कार रूपे आज समाजात रूढ होताना दिसत आहेत. त्यांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल.

**अ) इलेक्ट्रॉनिक्स मिडियातील अक्षरबद्ध/डीटीपी केलेली साहित्याची नवी अविष्कार रुपे–**

२१ व्या शतकातील धावपळीच्या करिअर ओरिएण्टेड युगात प्रत्येक माणसाला कमीत कमी वेळेत अनेकांशी संपर्क साधण्यासाठी स्मार्टफोन हे एक उत्तम साधन उपलब्ध झालेले आहे. व्यक्ती–व्यक्तींना आपापसात भेटायला, बोलायला वेळ मिळत नसेल तेव्हा स्मार्टफोनमधील व्हाट्सअप, फेसबुक, ट्विटर यांसारख्या जनसंपर्क साधनांचा वापर करून एकमेकांना शुभप्रभात, शुभरात्री, वाढदिवस, सणवार, नववर्ष इत्यादींचे शुभेच्छा संदेश, शोक संदेश कलात्मक भाषाशैलीत पाठविण्याची परंपरा आज बनू पाहत आहे. याबरोबर वैचारिक लघुलेख, अतिलघुकथा (अलक) लहान–लहान कविता, चारोळ्या, बोध देणारे सुविचार

ISSN : 2348-7143
January-2019

स्मार्टफोनच्या माध्यमातून पाठविले जातात. त्याद्वारे साहित्याच्या नवनव्या आविष्कार रुपांची निर्मिती व प्रसार होत आहे.

**ब) साहित्याची दृकश्राव्य माध्यमांतरित अविष्कार रूपे:-**

चित्रपट, दूरदर्शन या दृकश्राव्य प्रसारमाध्यमांच्या तंत्रज्ञानामुळे साहित्य मुद्रित रूपातून दृकश्राव्य माध्यमांत माध्यमांतरीत होण्याचे प्रमाण अलीकडे वाढलेले आहे. शेकडो वाहिन्या दाखविणाऱ्या दूरदर्शनवर प्रेक्षकांना आकर्षित करण्याची स्पर्धा लागलेली आहे. त्यामुळे जास्तीत जास्त लोकांना आवडतील असे कार्यक्रम तयार करण्यावर भर दिला जात आहे. त्याचबरोबर चित्रपट क्षेत्रातही अमूलाग्र बदल होत आहे. दूरदर्शनवरील धारावाहिक आणि चित्रपट यांचे पटकथा लेखन करणे, गाजलेल्या साहित्यकृतींची माध्यमांतरे करून नवीन अविष्कार रुपात त्यांना प्रेक्षकांपर्यंत पोहोचविले जात आहे. लहान मुलांना आवडतील, त्यांना खिळवून ठेवतील अशा ॲनिमेटेड रूपात कथा-कविता निर्माण केल्या जात आहेत. त्याचा खजिना यु-ट्युबवर उपलब्ध आहे. त्याच बरोबर श्रवणफितींचा आणि चित्रफितींचा वापरही वाढत आहे. त्यातून साहित्याची विविध आविष्कार रूपे जनतेसमोर येत आहेत.

**क) इलेक्ट्रॉनिक्स मिडियातील श्राव्य साहित्य :-**

स्मार्टफोनच्या माध्यमातून विविध ॲप्लिकेशन्स (ॲप्स) सहजगत्या हजारो लोकांपर्यंत पोहोचविली जात आहे. त्यातील 'बोलती पुस्तके' यांसारखे ॲप्स तर वाचनाचा कंटाळा येणाऱ्यांसाठी तसेच वाचनासाठी स्वतंत्र वेळ जे लोक काढू शकत नाही त्यांच्यासाठी वरदान ठरले आहे. मुद्रित साहित्याचे हे श्राव्य अविष्कार रुप आज बऱ्यापैकी लोकप्रिय होत आहे.

**ड) 'स्वतंत्र ॲप'च्या माध्यमातून साहित्याचे प्रसारण :-**

'बोलती पुस्तके' यासारख्या ॲपप्रमाणे स्वतंत्र ॲपच्या माध्यमातून कथा, कादंबरी, कविता यांचे स्क्रीनवरील अक्षरबद्ध/डीटीपी रुपे आज बरेच लोक वाचतात. मुद्रित स्वरूपातील नियतकालिकाप्रमाणेच ॲपच्या माध्यमातून डिजिटल मॅगझीनची परंपरा निर्माण होऊ पहात आहे. मराठीतील पुनश्च, दिर्घा यासारख्या 'बहुविध डॉट कॉम' सारख्या ॲप्सवरील डिजिटल नियतकालिकांची निर्मिती समाजाची गरज ओळखून केली जात आहे.

**समारोप:-**

औद्योगिक क्रांतीनंतर तंत्रज्ञानातील क्रांतीमुळे जनजीवन गतिमान झाले. माणसाच्या जीवनातील निवांतपणा कमी झाला. कमीत कमी वेळात जास्तीत जास्त जग समजून घेण्याचा प्रयत्न सुरू झाला. पाल्हाळीकतेपेक्षा स्फुटत्वाला महत्त्व प्राप्त झाले. कल्पतरू वृक्षाप्रमाणे आपली इच्छा आभासी पद्धतीने पूर्ण करण्याचे साधन मानवाला प्राप्त झाले. त्याचबरोबर तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे श्राव्य, दृकश्राव्य जनसंपर्क माध्यमांमुळे संवादाचा वेग वाढला. आपले विचार-भावना व्यक्त करण्यासाठी त्यांचा प्रभावीपणे वापर होऊ लागला. त्यातूनच साहित्याच्या विविध आविष्कार रुपांची निर्मिती होत गेली.

**संदर्भ:-**

१. आकाशवाणी : संवादाचे स्वरूप व कौशल्ये, य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक, आ. १ ली, पुनर्मुद्रण : एप्रिल १९९३
२. दूरदर्शन : संवादाचे स्वरूप व कौशल्ये, य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक, आ. १ ली, पुनर्मुद्रण : एप्रिल १९९३
३. दैनिक दिव्य मराठी, दि. ३१ डिसेंबर २०१८, पृ.क्र. ६